**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

**-: प्रेस नोट :-** दिनांक - २०/१२/२०२४

**आरे कॉलनी, गोरेगांव पु., मुंबई येथे कारवाई दरम्याण एकुन २८८ ग्रॅम 'हेरॉईन' किं.अ.१.१५ करोड हा अंमली पदार्थ जप्त करुन २ ड्रग्स् तस्करांना केले जेरबंद**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | १) अं.प.वि. कक्ष, गु.र.क्र. ८३/२०२४, कलम ८ (क) सह २१ (क), २९ एन.डी. पी.एस.कायदा १९८५. |
| **दाखल दिनांक** | दिनांक १९/१२/२०२४ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव पुर्व, मुंबई |
| **आरोपी संख्या** | १) पुरुष आरोपी, वय-२५ वर्षे<br>२) पुरुष आरोपी, वय-२४ वर्षे |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | **एकुण २८८ ग्रॅम वजनाचा हेरॉईन अं.किं. रूपये १,१५,००,०००/- रक्कमेचा मुद्देमाल जप्त.** |

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई सो. यांचे आदेशान्वये मुंबई व मुंबई उपनगरामध्ये अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, गु.अ.वि, मुंबई यांचेकडुन विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.

त्याअनुशंगाने अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **घाटकोपर युनिटचे** पथकाने अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत दिनांक १९/१२/२०२४ रोजी आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव पुर्व, मुंबई परिसरात गस्त दरम्याण मिळालेल्या गुप्त बातमीनुसार नमुद ठिकाणी छापा टाकुन एकूण दोन इसमांना ताब्यात घेवून त्यांच्याकडुन 'हेरॉईन' हा अंमली जप्त केला. नमुद ०२ ड्रग्स् पेडलर्सचे त्यांचे ताब्यातून एकूण २८८ ग्रॅम वजनाचा 'हेरॉईन' एकुण किं.अं. रु. १.१५ कोटी रूपये किंमतीचा अंमली पदार्थ मिळुन आल्याने, नमूद दोन्ही इसमांविरुध्द अं.प.वि.कक्ष घाटकोपर युनिटने ८३/२०२४ कलम ८(क) सह २१(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करुन ०२ आरोपींना अटक केली आहे. नमुद आरोपी हे मुळ उत्तराखंड राज्यातील राहणार असुन अटक आरोपी हे 'हेरॉईन' या अंमली पदार्थाची आंतरराज्यीय ड्रग्स् तस्करी करुन मुंबई शहरात व उपनगरातील परिसरात विक्री करत असल्याचे दिसुन आले आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास घाटकोपर युनिट, अंपवि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई हे करत आहेत.

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२४ मध्ये एकूण ८४ गुन्हे दाखल करून त्यामध्ये एकूण १७२ आरोपींना अटक करत त्यांचे ताब्यातून एकूण ३०१७.५९९ किलो अंमली पदार्थ अं.किं.रुपये ५९.६७ कोटी पेक्षा अधिक किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केला आहे. त्यामध्ये 'हेरॉईन' या अंमली पदार्थाचे एकुन ७ गुन्हे दाखल करण्यात आले असुन एकुन २.८९५ किलो वजनाचा किं.अं.११.२५ करोड रु चा हेरॉईन जप्त करण्यात येवुनएकुन २१ ड्रग्स् तस्करांना अटक करण्यात आले आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त (अति.कार्यभार), अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत घाटकोपर युनिटचे प्रभारी पो.नि. श्री. अनिल ढोले, यांचे नेतृत्वाखाली त्यांचे अंपवि.कक्ष घाटकोपर पथक यांनी केली आहे.

------oooo------